# “नागपूर जिल्हयातील वृद्धाश्रमांचे कामकाज आणि त्यांच्या प्रबंधनाचे विश्लेषणात्मक अध्ययन” कालखंड (2000–2009)

डॉ. स्वाती गोडे (भोयर) (एम.कॉम., एम.ए.(अर्थ), एम.फिल., बी.एड.)
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर

**प्रस्तावना**

18 शतकात औदयोगिक क्रांती घडून आली. नवीन तंत्राचा शोध लागून दळणवळणाची साधनेविकसीत झालीत. या औदयोगिक अवस्थेत व आज 21 व्या शतकात पदर्पणाच्या वाटेवर मानवाने बरीच प्रगती केली मात्र या उदयोग प्रधान अर्थव्यवस्थेतून पर्यावरण विषयक प्रश्न, आर्थिक विषमता, कुटुंब विघटनाचा मोठा परिणाम वृद्धांवर होऊ लागला. त्याचा आधार (मुले) आपली गरज पूर्ण करण्यासाठी त्यांच्यापासून दूर जाऊ लागलीत आणि वृद्धांना आधारासाठी वृद्धाश्रमाची पायरी ओलंडावी लागली. दिवसेन दिवस ही गरज वाढत गेली आणि आज जागतिकीकरणाच्या युगात इतर सोयी सुविधासोबतच प्रत्येक व्यक्ती स्वतःचा विकास उत्कर्ष करण्यासाठी झटत आहे. आपल्या राहत्या घरापासून दूर जाण्यास उत्सूक आहे. जागतिक अर्थव्यवस्थेचा काल, स्थळ व परिणाम हया तीन पैलूंच्या आधारे स्वतःच्या प्रगतीच्या मागे लागते. त्यामुळे त्याचे कुटुंबाकडे व वृद्ध आई–वडीलांकडे दूर्लक्ष होते. ते निराधार होतात व त्यामुळे वृद्धांना आधारासाठी वृद्धाश्रमाची पायरी ओलांडावी लागते.

**Key-Words(सुचना शब्द)**

निराधार वृद्ध, वृद्धाश्रमाचे प्रकार, वृद्धाश्रमांची संख्या, वृद्धाश्रमांचे कामकाज, वृद्धाश्रमांचे प्रबंधन, सामाजिक बांधिलकी.

**वृद्धाश्रमाची व्याख्या –वैशिष्टये**

डॉ. शिवराज शास्त्री यांनी लिहील्याप्रमाणे ‘‘मनुस्मृति च्या नुसार जेव्हा, व्यक्तिला शरिरावर सुरकुत्या दिसतात डोक्यावरचे केस पांढरे होतात, त्याच्या पुत्राला पुत्र प्राप्त होतो. तेव्हा त्याने वानप्रस्थ व्हावे जेव्हा चिंतने माथ्यावर वळ्या पडतात. नजर शुन्य बनते. दातवीना पोकळ तोंड असते. तेव्हा त्या व्यक्तीला वृद्ध म्हणता येईल’’.

**वैशिष्टये :–**

1) वयाची 60 ते 70 वर्ष पूर्ण होतात.
2) डोळे, कान, नाक, दात, आपले कार्य योग्यप्रकारे करणे बंद करतात.
3) शरिरात वाढत्या वयाबरोबर विविध परिवर्तन होतात.
4) शारिरीक आणि मानसिक आजार जडतात.
5) वृद्धावस्था ही स्वाभाविक जैविक प्रक्रिया आहे.
6) माणसांच्या स्नायुंची ताकद वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी पुर्णत्वास पोहचतेआणि वयाच्या 60 व्या वर्षी 12ः घटते.
7) या अवस्थेत व्यक्तीच्या विचार सरणीचा ऱ्हास होऊन व्यक्ती विसरभोळाबनतो.

**वृद्धाश्रम निर्मितीची प्रमुख कारणे :–**

1) संयुक्त परिवाराचे विघटन
2) नवीन सुख सुविधांची वृद्धी
3) नवीन व जुन्या पिढीमधील विचारांची तफावत
4) औदयोगिकरण
5) आधुनिकीकरण
6) पाश्चात्यीकरण
7) पैशाला प्रमुख प्राधान्य
8) व्यक्तीगत स्वार्थ
9) सामंज्यसाचा अभाव
10) वृद्धांच्या निराधारतेत वाढ

**वृद्धाश्रमे निर्मितीची संकल्पना :–**

भारतामध्ये 19 व्या शतकात वृद्धांची समस्या नव्हती. मात्र 20 व्या शतकात वृद्धांची समस्या भारतामध्ये उद्भवू लागली. पश्चिमात्य देशात 19 व्या शतकातही वृद्धांच्या समस्या मोठया प्रमाणात होतात. औदयोगिकरण, नागरीकरण

आणि आधुनिकीकरणाच्या प्रभावामुळे संयुक्त कुटुंबाचा ऱ्हास होऊन विभिन्न कुटुंब पद्धती अस्तित्वात आली. शहरी व ग्रामिण भागातही वृद्धांच्या समस्येत वाढझाल्याचे दिसून येते. ग्रामिण भागातून शहरात व शहरातून विदेशात तरूणांचे स्थंलातरण यात मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरते.भारतामध्ये विविध ठिकाणी पुढील वर्षात वृद्धाश्रमे स्थापन झाल्याचे दिसून आलेत.

| वर्ष | शहर | वृद्धाश्रमाची नावे |
|---|---|---|
| 1840 | बंगलोर | द फ्रेड्स इन निड सोसायटी |
| 1865 | पुणे | डेव्हिस वृद्धाश्रम |
| 1885 | कलकत्ता | लिटील सिस्टर फॉर द पुअर |
| 1890 | दिल्ली | होम फॉर ऐजेड ॲण्ड हॅण्डीक्राप्ट |
| 1992 | सुरत | अशक्त व्यक्तीसाठी आश्रम |

यावरुन लक्षात येते की, 1840 मध्ये सुद्धा वृद्धांची समस्या होती आणि वृद्धाश्रमाची गरज मोठ्याप्रमाणात वाढत गेली.

**संशोधन पध्दतीः–**

प्राथमिक स्त्रोत :–अंतर्गत प्रत्यक्ष माहिती प्राप्त करण्याकरीता प्रश्नावली पद्धतीचा उपयोग केला. त्याकरीता वृद्धाश्रम व्यवस्थापक, वृद्ध, कर्मचारी यांच्याकडून प्रश्नावली भरुन घेण्यात आली.

द्वितीय स्त्रोत :– अंतर्गत पेपर, सरकारी गॅझेट, वृद्धाश्रमातील कार्यालयातील माहिती, माहिती पुस्तीका इत्यादी चा उपयोग करण्यात आला.

**अध्ययनाचा उद्देश :–**

- नागपूर जिल्हयातील वृद्धाश्रमाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
- वृद्धाश्रमातील प्रबंधन कसे चालते हे जाणून घेणे.
- वृद्धामातील खर्च व उत्पन्नाची साधने जाणून घेणे.
- आजच्या काळात वृद्धाश्रमाची गरज आहे का ? हे जानणे.
- वृद्धाश्रमातील दैनंदिन कामकाजाची माहिती प्राप्त करणे.

**अध्ययनाची गृहीत तत्वे**

1. वृद्धाश्रमातील कामकाज प्रामुख्याने सरकारी अनुदानावर व प्राप्त देणग्यांवर अवलंबून असते.
2. वृद्धाश्रमाचा उद्देश वृद्धांची सेवा करणे हा असतो.
3. वृद्धाश्रमाची आर्थिक स्थिती बेताचीच असते.
4. वृद्धाश्रमाचे व्यवस्थापन परंपरागत व व्ययवसायीक दोन्ही पद्धतीने चालते.

**नमुन्याच्या स्वरुपात निवडलेली वृद्धाश्रमे**

| अ.क्र संख्या | वृद्धाश्रमाची नावे | एकूण वृद्धसंख्या | नमुना |
|---|---|---|---|
| 1 | दुर्गावती वृद्धाश्रम | 100 | 10 |
| 2 | पंचवटी वृद्धाश्रम | 100 | 10 |
| 3 | कृपासदन वृद्धाश्रम | 40 | 04 |
| 4 | म्यूर मेमोरीयल वृद्धाश्रम | 25 | 03 |
| 5 | मैत्रबन वृद्धाश्रम | 150 | 15 |
| 6 | स्वामी विवेकानंद | 40 | 04 |
| 7 | श्री. साईसदन वृद्धाश्रम | 25 | 03 |
| 8 | आधार वृद्धाश्रम | 50 | 05 |
| 9 | मातोश्री वृद्धाश्रम | 120 | 12 |
| 10 | श्री. स्वामी समर्थ वृद्धाश्रम | 20 | 05 |

**विविध वृद्धाश्रमांना पुढील स्त्रोता अंतर्गत उत्पन्न प्राप्त होत असते.**

- सरकारी अनुदान
- वार्षिक शुल्क
- प्राप्त देणगी

- प्रवेश शुल्क
- मुदत ठेव
- इतर उत्पन्न

**वृद्धाश्रमाच्या उत्पन्नाचे स्त्रोत**

दुर्गावती वृद्धाश्रमाचे उत्पन्न दर्शवीणारी तालीका

| उत्पन्नाचे स्त्रोत | 2000 | | 2002 | | 2005 | | 2007 | | 2009 | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | रुपये | प्रतिशत | रुपये | प्रतिशत | रुपये | प्रतिशत | रुपये | प्रतिशत | रुपये | प्रतिशत |
| सरकारी अनुदान | 70,000 | 22.22 | 70,000 | 21.26 | 75,000 | 21.95 | 75,000 | 21.10 | 74,000 | 20,44 |
| वर्षिक शुल्क | 1,50,000 | 47.62 | 1,70,000 | 51.64 | 1,74,000 | 51.25 | 1,80,000 | 50.64 | 1,85,000 | 40,68 |
| प्राप्त देणगी | 50,000 | 15.87 | 60,000 | 18.23 | 62,000 | 18.17 | 64,000 | 18.25 | 70,000 | 19,18 |
| प्रवेश शुल्क | 20,000 | 6.35 | 2,200 | 0.66 | 2,200 | 0.64 | 2,400 | 0.67 | 2,500 | 0,68 |
| मुदत ठेव | 15,000 | 4.76 | 12,000 | 3.64 | 10,000 | 2.93 | 14,000 | 3.93 | 17,000 | 4,66 |
| इतर उत्पन्न | 10,000 | 3.17 | 15,000 | 4.56 | 17,000 | 4.98 | 19,000 | 5.34 | 15,000 | 4,11 |
| एकुण | 3,15,000 | | 3,29,200 | | 3,41,200 | | 3,44,400 | | 3,64000 | |

**वृद्धाश्रमाच्या खर्चाची साधने**

वृद्धाश्रमांच्या अभ्यासाअंतर्गत खर्चाच्या साधनाचा विचार करता असे लक्षात आले की, असे अनेक साधन आहेत त्यावर नियमित खर्च करावा लागतो. आश्रमाचे स्वरुप खाजगी असो वा सार्वजनिक प्रत्येक वृद्धाश्रमात वर्षभर आवश्यक तो खर्च करावाच लागतो.

साधारणतः पुढील घटकावर वृद्धाश्रमाचा खर्च होत असतो.

- अन्नधान्य
- वस्त्र
- निवारा
- औषधी
- मनोरंजन
- धार्मिक कार्य
- प्रशासकिय काय

**दुर्गावती वृद्धाश्रमाचे खर्च दर्शवीणारी तालीका**

| खर्चाची साधने | 2000 | | 2002 | | 2005 | | 2007 | | 2009 | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | रुपये | प्रतिशत | रुपये | प्रतिशत | रुपये | प्रतिशत | रुपये | प्रतिशत | रुपये | प्रतिशत |
| अन्नधान्य | 2,00,000 | 63ः | 2,40,400 | 76.99 | 2,65,000 | 77.6 | 2,77,400, | 76 | 2,90,000 | 69,6 |
| वस्त्र | 6,000 | 1.90 | 10,000 | 3.07 | 8,000 | 2.34 | 14,000 | 3.9 | 8,500 | 2,33 |
| निवारा | 4,000 | 1.27 | 8,500 | 2.6 | 8,800 | 2.38 | 70,000 | 1.96 | – | – |
| औषधी | 62,500 | 19.63 | 40,000 | 15.37 | 40,000 | 2.65 | 60,400 | 12 | 53,550 | 14.7 |
| मनोरंजन | 13,500 | 4.28 | 4,500 | 1.35 | – | – | 2000 | 0.56 | 2500 | 0.68 |
| धार्मिक कार्य | 12,000 | 3.80 | 1,800 | 0.44 | 4,000 | 1.46 | | – | 2500 | 1.51 |
| प्रशासकिय कार्य | 17,000 | 9.39 | – | – | 8,800 | 1.23 | 1400 | 0.39 | 2000 | 0.54 |
| एकून | 3,15,000 | – | 3,24,200 | – | 3,41,200 | – | 3,44,400 | | 2,62,050 | |

वरील वृद्धाश्रमाच्याखर्चाप्रमाणेच कमी–जास्त इतर वृद्धाश्रमाचे ही नियमित खर्च होत असतात. काही कार्यावर नियमित खर्च होतात. तर प्रशासकिय आणि मनोरंजनावर आवश्यकते प्रमाणे खर्च केले जातो.

**सामाजिक स्थिती :–**

सामाजिक परिवर्तनाचे परिणाम फार खोलवर झाल्याचे दिसून येतात. सामाजिक परिवर्तनामुळे प्रचलित सामाजिक व्यवस्थेत विस्कळीतपणा येऊन समाजवयवस्थेत अनिष्ठ परिणाम घडून येतात. याचे दिर्घकाळ भविष्यकालीन पिढीवर वाईट परिणाम होतात. भौगोलीक परिस्थिती, लोकसंख्या राहाणीमाणाचा दर्जा, जैविक परिस्थिती, सांस्कृतीक आर्थिक परिस्थिती इत्यादी.घटकांचा परिणाम समाजाचा दृष्टीकोण बदलविण्यास यशस्वी होत असते.

आज मानवाने विविध शोध लावलेत पण कुटुंबापेक्षा वेगळी आणि चांगल्या संघटनेचा शोध अजूनही लावता आला नाही. सामाजिक पातळीवर कुटुंबाचे प्राथमिक सामाजिक व आर्थिक कार्य असतात ही कार्य योग्यप्रकारे करण्यासाठी घरातील वरिष्ठ लोकांची मदत सतत भासत असते. कुटुंबातील सदस्य संख्येचा आधारावर प्राथमिक केंद्र कुटुंब व संयुक्त कुटुंब असे दोन प्रकार पहावयास मिळतात.

संयुक्त कुटुंबामुळे सामाजिक सुरक्षितता निर्माण होते प्रत्येक वयोगटातील मुलांचे योग्य संगोपन होण्यास मदत मिळते. व्यक्तिवादी दृष्टीकोणास प्रतिबंध लागतो. खर्चामध्ये बचत होऊन उत्पन्नाच्या साधनांचा पूर्ण उपयोग होतो. घरे हे मनोरंजनाचे व शिक्षणाचे साधन बनते त्यामुळे मुलांना वेगळ्या शिकवणी वर्गात जाण्याची गरज नसते. राष्ट्रीय एकात्मता प्रोत्साहन प्राप्त होते. वृद्धांचे सतत मार्गदर्शन लाभवत असल्यामुळे तयार होणारी पिढी सुसंस्कृत, विचारी प्रभावशाली, बनते मात्र आधुनिक विभिन्न कुटुंब पद्धती मुळे हे विविध संस्कार मुलांवर होत नाही. त्यामुळे ते चिडखोर, एकलकोंडे, जिद्दी बनतात. आणि वृद्ध ही एकाकी पडतात.

**समाजातिल वृद्धामध्ये आढळणाऱ्या समस्या**

शारिरीक समस्या
मानसिक समस्या
आर्थिक समस्या
सामाजिक समस्या
परंपरागत समस्या
सामाजिक समायोजन

**समाजातिल नोंदणीकृत अहवालानूसार**

आज आपल्या देशात 31 मार्च 2015 पर्यंत जागतिक आरोग्य संघटनेच्या नोंदणीकृत अहवालानूसार जेष्ठ नागरीकांची नोंद 12 कोटी 83 लाख 36 हजार इतकी आहे. महाराष्ट्रात जवळजवळ 1 कोटी 87 लाख जेष्ठ नागरीक आहेत. त्यापैकी केंद्र व राज्य शासनाचा सेवेतून निवृत्त झालेल्यांची फक्त 17ः नोंद असून उरलेले 83 टक्के जेष्ठ समजल्या जाणाऱ्या वृद्धांची सतत धडपड सुरु असते. सेवा निवृत्ती वेतनाप्रमाणे त्यांना एकही पैसा मिळत नसल्यामुळे त्यांचे पाल्य व परिवाराकडून दुर्लक्षीत पणामुळे त्यांना सार्वजनिक मंदीरे, प्राथनास्थळे, अन्नछत्र, उपहारगृहे, अशा ठिकाणी दिवस काढावे लागतात. बरेचदा समाजाद्धारे चांगली वागणूक मिळण्या सोबतच वृद्धांचे शारिरीक, मानसिक, आर्थिक शोषण होत असल्याचे आढळुन येते.

ऐजवेल या संस्थेच्या निष्कर्षात असे सांगीतले की35 कोटी वृद्धांना प्रत्येक्षात त्यांच्या घरातून, मुलांकडू, सुनेकडून, तर शेजारुन सतत टोमणे व अपमानीत होऊन जगावे लागते.

**वृद्धश्रमाचे प्रबंधन व कामकाज :–**

अभ्यासाअंतर्गत घेतलेल्या सर्व खाजगी अनुदानित 50ः अनुदनित, व धमार्थ चालनारी सर्व वृद्धाश्रमे प्रबंधन व कामकाजाबाबत वेळेचे योग्य बंधन पाळण्याचा प्रयत्न करतात. प्रत्यक्ष आश्रमात सकाळी उठण्यापासून ते रात्री झोपेपर्यंत एक व्यवस्थित दिनक्रम ठरविण्यात आलेला आहे. त्यात सकाळचा प्रातः विधी, योगा नाश्ता, जेवन, दुपारची विश्रांती मनोरंजन, संध्याकाळचे बागकाम, भजन ते रात्री चे जेवण व झोपेपर्यंतचा काळ योग्यप्रकारे काटेकोर पाळण्याचा प्रयत्न वृद्धाश्रम प्रबंधन व व्यवस्थापकाद्धारे होत असतो. तसेच वृद्धाश्रमातील वृद्ध देखील योग्य प्रतिसाद देत असतात.

**वृद्धाश्रमाविषयी सरकारी धोरणे**

1) प्रत्येक वरिष्ठ नागरीक, आईवडील, आजीआजोबा जे आपल्या व्यक्तीगत उत्पन्नातुन स्वतःचे पोषण करण्यात असमर्थ आहेत. ते आपल्या मुलांवर भरण पोषणाचा दावा करु शकतात.
2) राज्य सरकारने उपमंडळ स्तरावर भरण पोषण न्यायाधिकरण स्थापित केलेले आहे. वरिष्ठ नागरीक आपल्या भरण पोषणाकरीता या न्यायालायात अर्ज सादर करु शकतात.
3) जर वरिष्ठ नारीकांना स्वतः अर्ज करण्यास असमर्थ असल्यास त्यांच्याद्वारे अधिकृत कोणतीही व्यक्ती किंवा नागरीक अर्ज दाखल करु शकतो.
4) सामाजिक न्याय व अधिकाराकरीता मंत्रालय भारत सरकार द्वारा दिलेल्या अधिनियमात आईवडील आणि वरीष्ठ नागरीकाकरीता भरणपोषण तसेच कल्याण अधिनियम 2006 नूसार कायदेशीर दायीत्व प्रत्येक नागरीकांचे आहे.
5) संसदेत डिसेंबर 2006 मध्ये परित झालेला हा कायदा 7 संघराज्य आणि 25 राज्यांद्वारे लागू करण्यात आला आहे.

**निष्कर्षः–**

विविध वृद्धश्रमाच्या अभ्यासावरुन असे लक्षात येते की, उत्पन्नाचे जे विविध स्त्रोत आहेत. त्यांच्या मध्ये दरवर्षी काही प्रमाणात वाढझाल्याचे आढळते. मात्र देणग्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढझाल्याचे आढळत नाही. त्यामुळे प्रबंधनाला योग्य उत्पन्न व खर्चाची व्यवस्था करण्यास मदत प्राप्त होते.

खर्चाचा विचार केल्यास वाढत्या महाईमुळे वृद्धाश्रमाच्या दैनदिन खर्च मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यातही इतर खर्चाचा तुलनेत अन्न धान्याचा खर्चात अधिक वाढ होत आहे.

**शिफारसी (उपायोजना)**

1)महारष्ट्र सरकार, केन्द्र सरकारने वृद्धाश्रमांना निश्चित अनुदान दयावे.
2) वृद्धाश्रमाना सहाय्य करणाऱ्या व्यक्ती, संस्थाना आयकरातुन सुट देण्यात यावी.
3) सामाजिक संघटनानी सरळ हाताने वृद्धाश्रमांना मदत करावी.
4) आश्रमात व्यवस्थापकानी मनोरंजनाची भरपूर साधने उपलब्ध करुन दयावी.

**संदर्भसुची**

१) समाजिक संशोधन पध्दती :– डॉ बोधनकर
२) भारतीय अर्थव्यवस्था–प्रा.देव, प्रा.झामरे,
३) वृद्धाश्रम नव्हे आनंदाश्रम– उषा टोळे
४) विवेकी पालकत्व– डॉ अंजली जोशी
५) व्यवसाय व्यवस्थापन – प्रा. डॉ प्रभाकर देशमुख
६) वृद्धाश्रम आणि स्वास्थ्य – एन. कश्यप
७) मानव संसाधन व्यवस्थापन– प्रा. बी.एल.जीभकाटे
८) www.sahadiscom.com
९) www.soclaljustice.nic.in